# राही पंढरीनाथ लिमये

# जीवन छटा



# जीवन छटा

## हे पुस्तक विनामूल्य आहे पण

## फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ई साहित्य प्रतिष्ठान

## सादर करीत आहे

# जीवन छटा

(लघुत्तमकथासंग्रह)

लेखिका

राही पंढरीनाथ लिमये

# जीवन छटा (लघुत्तमकथासंग्रह)

# लेखिका: राही पंढरीनाथ लिमये

फ्लॅट नं सी 14
आशीर्वाद सोसायटी. राहुल नगर समोर.
कोथरूड़, पुणे. 411038
मोबाईल 9860499623
मेल आयडी rahi. limaye8@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
**प्रकाशन : ५ ऑगस्ट २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## मनोगत -



माझं दुसरं इ पुस्तक "जीवन छटा" वाचकांसमोर सादर करताना माझा आनंद द्विगुणीत झाला आहे.

माझं पहिलं इ पुस्तक "जीवन रंग" हे लघुकथांच आहे.

"जीवन छटा" हे पुस्तक लघुत्तम कथांच आहे. कमी शब्दात कथेचा पूर्ण आशय सांगणे हे ह्याचं कौशल्य आहे. इथे ही मी जीवनातल्या सुख दुःखांच्या, उन-पावसाच्या विविध छटा दाखवल्या आहेत. माझी खात्री आहे वाचकांना हे ही पुस्तक नक्की आवडेल.

राही पंढरीनाथ लिमये.

## आभार-



सखी ग्रुपवरच्या माझ्या सगळ्या सख्या ज्या मला नेहमी प्रोत्साहीत करतात. तसेच माझी भाची प्रांजली ह्यांचे आभार.

सुनीळ सामंत व ई साहित्य च्या सर्व टीमचे मी मनापासून आभार मानते.

राही पंढरीनाथ लिमये.

**|| श्री ||**

## अर्पण पत्रिका-

माझा मुलगा चि. कौशिक जो नेहमी माझ्या बरोबर उभा असतो त्याला हे पुस्तक अर्पण करताना मला खुप आनंद होत आहे.

तसेच माझ्या सर्व सख्या आणि सुहृदानी नेहमी मला प्रोत्साहन दिले त्यांना हे पुस्तक अर्पण करते.

# प्रस्तावना

राही लिमये यांचं लघुत्तम कथांचे पुस्तक म्हणजे मनोरंजन आणि प्रबोधन याचा समसमा संयोग  असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. या कथा वाचल्या की मनापर्यंत एक संदेश निश्चीत पोहोचतो . अशा कथा लिहिण्याची त्यांची हतोटी विलक्षण आहे त्याचमुळे आश्चर्यचकित होण्याची वेळ वाचकांवर येते. कमितकमी शब्दात आशयघन असणाऱ्या या कथा एका वेगळ्या अनुभवविश्वात घेउन जातात व निश्चीत परीणाम साधतात . आज वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे ती अशा रंजकसाहित्यामुळे पुन्हा एकदा मुळ पदावर येईल अशा अपेक्षेसह या कथा संग्रहाला शुभेच्छा देते.

डॉ.  विनिता आपटे

(संस्थापक संचालक, तेर पॉलीसी सेंटर)

# अनुक्रमणिका

1 हुकुमाचा एक्का
2 आनंदाचे झाड
3 तृप्ती
4 ऋणानुबंध
5 आत्मभान
6 स्वातंत्र्य
7 पितृप्रेम
8 समाज मन
9 आत्मनिर्भर
10 असमंजस
11 स्वत्व
12 माझीया मना
13 गिफ्ट
14 आत्मविश्वास
15 आनंद
16 ओटी
17 अबोल प्रित
18 अगतिक मातृत्व
19 सखा
20 अंतर
21 विश्वास
22 सहचारीणी
23 निरागस प्रश्न
24 हळदी कुंकू
25 भातुकलीच्या खेळामधली
26 पांडुरंग हरी
27 मनाची ताकद
28 कान्हा
29 आत्मानंद
30 गुरु दक्षिणा
31 मदर्स डे

या कथा काल्पनिक आहेत. कुठल्याही व्यक्ती, घटना किंवा स्थळाशी साधर्म्य आढळल्यास तो योगायोग समजावा

# जीवन छटा

लघुत्तमकथासंग्रह

# 1 हुकुमाचा एक्का

ती लग्न होऊन एकत्र कुटुंबात आली आणि कामाच्या रगाड्यात हरवून गेली. माहेरी ती आणि आई वडील तिघच होते. इथे सासू सासरे, दीर, जावा, आत्येसासू, बरीच माणसं होती. हळूहळू भरपूर कामं तिच्या गळयात पडली. नाही म्हणणं तिला जमत नव्हतं. तिच्या नवऱ्याने तिला सावध केलं. तुला सगळे गृहीत धरतात. सगळयांची कामं तू का करतेस? ज्याची त्याला आपली कामं करु देत. आत्येसासू म्हणाली मान मिळत नाही. आपला मान आपणच ठेवायचा असतो. नाही तर जोकर व्हायला वेळ लागत नाही.

दोन दिवस तिची आई रहायला आली. ही पोळया करताना आईशी गप्पा मारत होती. वहिनी तिथे आल्या आणि हिच्या आईला ऑर्डर सोडली मला सरबत करुन द्या. हिचे डोळे खाडकन उघडले. थांब आई. वहिनी आई तुमची नोकर नाही. सरबत तुम्ही करा. सगळयांसाठी करा आणि हो आत्याबाई पण त्यात आल्या. आज हुकुमाचा एक्का तिने हातात घेतला. तिच्यातला जोकर आनंदाने हसत होता.

****

## 2 आनंदाचे झाड

व्हाट्सअ‍ॅप ग्रुपवरच्या परगावाहुन आलेल्या मैत्रिणीने बिझी शेड्युल मधुन वेळ काढुन बाहेर भेटायचे ठरवले. त्या चौघी पहिल्यांदाच भेटल्या. पण प्रत्येकीला वाटत होतं आपण जुन्या मैत्रिणी आहोत. खुप वर्ष भेटतो आहोत. नवखेपणा जाणवत नव्हता. परगावी आणि परदेशात असलेल्या मैत्रिणींचे मेसेज आले. आम्ही प्रत्यक्षात नसलो तरी मनाने तुमची भेट एन्जॉय करतोय. प्रेमाची मुळं रुजुन हा विस्तारलेला मैत्रवड. त्याच्या पारंब्यावरचे झोके मनात आनंद पसरवत होते.

## 3 तृप्ती

आयुष्यभर कष्ट करून सुध्दा तिच्या चेहऱ्यावर नेहमी हास्य असे. ती बरेच वर्षानी मैत्रिणींबरोबर बाहेर निघाली तेव्हा तिचा अबोल मुलगा तिला म्हणाला आई भरपूर पैसे घेऊन जा. तुला पाहिजे ते खरेदी कर. अजिबात संकोच करु नको. आयुष्य भराच्या कष्टांच चीज झाल्याचा आनंद तिच्या मनात भरला. मग डोळयातून गालावर उतरला.

## 4 ऋणानुबंध

आता पूर्वीचा काळ राहीला नाही. सगळे पैशाच्या मागे धावतात. माणूस माणसापासून दुरावला. हे खरं आहे. पैसा महत्वाचा आहेच पण माणूस जोडणं ही तेवढच महत्वाचं आहे. प्रेम दिलं की प्रेम मिळतं. तिने जेव्हा मैत्रिणीं बरोबरचे फोटो घरच्या ग्रुपवर टाकले तेव्हा परदेशात असलेल्या तिच्या भाचीला खुप आनंद झाला. तिचा मेसेज आला. तुला एन्जॉय करताना बघुन खुप छान वाटलं. हिच्या मनातला आनंद तिच्या मनापर्यंत पोहचला होता. एकमेकींवरच्या प्रेमाच्या बीजातून आनंदाचं झाड वाढलं होतं.

****

# 5 आत्मभान

आजी स्वतःच्या खोलीत असत. त्यांची सून नेहमीप्रमाणे त्यांच खाणं पिणं, औषध पाणी सगळं व्यवस्थित करत असे. पण आजींचा हट्ट असे की आता सुनेला सून आलीय तर नातसुनेनेच घरचं सगळं केलं पाहिजे. नातसून कंपनीत मोठ्या पोस्टवर असलेने तिला फारसा वेळ मिळत नसे. तरीही सुट्टीच्या दिवशी ती कामं करत असे. एकदा ह्यांनी मुलाला आणि सुनेला सांगितलं मी अजून सर्व घर सांभाळु शकते. सुट्टीच्या दिवशी तुम्ही एकमेकांना वेळ द्या म्हणजे तुमच्यातलं बॉण्डिंग घट्ट होईल. मग एक दिवस रोजची कटकट थांबवायला सूनबाईनी आजीना स्पष्टपणे बजावलं परत विषय काढायचा नाही. तुमची हुकुमशाही माझ्या सुनेवर चालवायची नाही. माझ्या सुनेने कसं वागायचं हे सासु म्हणून मी ठरवणार. जसं मी कसं वागायचं हे तुम्ही ठरवलत तसं. आता घरातलं लक्ष काढुन घ्या. शांतपणे उरलेलं आयुष्य जगा.

## 6 स्वातंत्र्य

मुलाचं लग्न ठरलं आणि विनीताने होणाऱ्या सुनेला आणि मुलाला समोर बसवून सांगीतलं लग्न झाल्यावर सहा महिन्यांनी तुम्ही वेगळे रहा. सून कावरीबावरी झाली. विनीताने तिचा हात हातात घेतला. तु समजुन घेशील असं गृहीत धरून बोलते. आमच्या लग्नाला पस्तीस वर्षे झाली लग्न झाल्यापासून फक्त जबाबदारीचं ओझं आम्ही पेललं. घरात माणसं ही जास्त होती त्यामुळे हौस मौज, नवी नवलाई हे काही आम्हाला मिळालं नाही. नवेपणाचं तुम्हाला स्वातंत्र्य मिळेल आणि जबाबदारी ही कळेल. तसच आम्हाला स्वातंत्र्य मिळेल. आमचं राहीलेलं आयुष्य आम्ही मनाप्रमाणे जगु. थोडं रिलॅक्स होऊ. एकमेकांना वेळ देऊ. चालेल ना? गैरसमज करून घेऊ नका. सुनेने तिला मिठी मारली. मुलाने जवळ घेतलं आणि ती भरून पावली.

# 7 पितृप्रेम

आई जाऊन सहा महिने झाले होते. बाबा बारीक दिसायला लागले होते. ते कंपनीत येत नव्हते त्यामुळे अंकुशवर सगळी जबाबदारी पडली. तो जास्त बिझी झाला. सकाळी बाहेर पडला की घरी रात्री उशिरा येत असे. तरी ही तो सियाला म्हणाला सून म्हणून बाबांकडे लक्ष द्यायची आता तुझी जबाबदारी आहे. त्याना डॉक्टरकडे ने. तिने लक्ष दिलं नाही. सकाळी तो रूममध्ये असताना त्याच्या लहानपणापासून स्वयंपाक करणाऱ्या काकु आल्या. अंकुश तुझ्याशी काही बोलायचंय. माझी नोकरी गेली तरी चालेल पण नाईलाज झाला म्हणून आले. सूनबाई साहेबांना आवडत नाहीत तेच पदार्थ, भाज्या बनवायला सांगते. सुरवातीला मी सांगून पाहिलं पण तिने स्पष्ट सांगितलं आता माझं राज्य आहे. मी सांगेन तसाच स्वयंपाक करायचा. इतकी वर्षे खाल्लेले पदार्थ त्याना मिळत नाहीत. ते बारीक झालेत.

ठिक आहे. बघतो मी.

त्या दिवशी दुपारी अंकुश जेवायला घरी आला. ते तिघे जेवायला बसले. खरं सिया तु बाबा ना डॉक्टरकडे नेलस का?

नाही रे. वेळ नाही झाला.

काकु आज स्वयंपाकाला चव नाही. असं का?

त्यानी सियाकडे बघितलं. सिया काकु आजपासून फक्त बाबा ना हवा तसा बाबांचा स्वयंपाक करतील. आपला स्वयंपाक तु करायचा. तु काकूंच्या कामात ढवळाढवळ करणार नाहीस. ह्यात कोणताही बदल होणार नाही. हे तुला मान्य नसेल तर दरवाजा उघडा आहे. ज्यांच्या कष्टावर उभं राहिलेले ऐश्वर्य उपभोगतेस त्यांच्याशी असं वागताना तुला लाज कशी वाटली नाही? बाबा मला क्षमा करा. आणि उद्यापासून तुम्ही दुपारी कंपनीत यायला सुरुवात करा म्हणजे तुम्ही फ्रेश व्हाल. त्याने बाबा ना मिठी मारली. बाबांच्या चेहऱ्यावर हास्य फुललं. सिया खाली मान घालून उभी होती.

****

# 8 समाज मन

त्यांच्या टीन एजर मुलाने आत्महत्या केली. पोलिसांचा फोन आला आणि त्या दोघाना प्रचंड धक्का बसला. दोघं ही मोठ्या पोस्टवर. समाजात मान. लोकप्रिय प्रतिनिधी. काय झालं अचानक? सगळं तर चांगलं होतं. ते गोंधळले होते. कारण कळत नव्हतं. समाजातल्या लोकांनी स्वतःला न्यायाधिशांच्या खुर्चीत बसवलं. असंख्य जीभा वळवळु लागल्या. खरं कोणालाच माहित नव्हतं. लोकांनी आई वडिलांना आरोपीच्या पिंजऱ्यात बसवलं. मुलाला व्यसनी, बाहेरख्याली ठरवलं. आई वडील करप्ट आहेत म्हणून मुलाचा खुन झाला अशी चर्चा झाली. हजार तोंडानी हजार वाक्बाण बाहेर पडले. एकुलता एक मुलगा गमावल्याचं त्यांच दुःख कोणाच्याच मनापर्यंत पोहचलं नाही. इतकी असंवेदनशिलता? दुसऱ्याच्या दुःखावर डागण्या देणे. ही क्रुर मानसिकता कधी बदलेल?

****

# 9 आत्मनिर्भर

सायलीचे बाबा गेल्यावर ती आणि तिची आई दोघीच रहायच्या. आई नोकरीमुळे दिवसभर बाहेर असे. सायलीचं कॉलेज, क्लास, खेळ, मित्र मैत्रिणी, लायब्ररी ह्यात ती एंगेज राही. दोघी मायलेकी आठ वाजता घरी येत. दोघी नेहमी हसतमुख आनंदी असत. सुट्टीच्या दिवशी पिक्चर, नाटक, हॉटेलिंग चालु असे. पण त्यांच आनंदी रहाणं लोकांना टोचत असे. आईच स्वैर वागते मग लेकीला काय बोलणार? लोकांनी लगेच कॅरॅक्टर सर्टिफिकेट देऊन टाकलं. त्या दोघीना काही प्रॉब्लेम येत असतील पण त्या जिद्दीने तोंड देतात ह्याचा विचार नाही. मदत करायची नसेल तर करु नका. पण खोट्या अफवा पसरवु नका. दुसऱ्याचं चरित्र काळं करुन विकृत आनंद घ्यायचा.

# 10 असमंजस

नव्वद वर्षाची विस्मरण झालेली म्हातारी आई तिचे साठी पार केलेले मुलगा, सून. त्यांच्या सोबतीला डायबिटीस, बी.पी. त्यांचे मुलगा सून नोकरी साठी दिवस भर बाहेर. त्यांचा लहान मुलगा म्हणजे नातु सांभाळायचा. विस्मरण झालेल्या आईकडे लक्ष द्यायचं. तिच्या जेवलेलं ही लक्षात रहात नव्हते. दिवसभर दोघांना सांभाळताना ते दोघे दमुन जात. आजुबाजुला खमंग चर्चा म्हातारी ला उपाशी ठेवतात. स्वच्छ ठेवत नाहीत. सगळं लक्ष नातवाकडे. सुनेला नोकरी सोडायला सांगत नाहीत. पैशाची हाव दुसरं काय? म्हाताऱ्या आईला ती मागेल तसं खायला दिलं तर तिची तब्येत बिघडते .हे कोण लक्षात घेणार? पैशाची हाव नाही तर गरज कष्ट करायला भाग पाडते. पण हे समजून घेण्यासाठी संवेदनशील मन लागते. दुसऱ्यांच्या दुःखात आनंद शोधणाऱ्या ह्या विकृत माणसांना काय बोलणार?

***

# 11 स्वत्व

शोभा ब्युटी पार्लरमध्ये शिरली तेव्हा तिची शेजारीण अस्मिता तिला बघुन म्हणाली शोभा तू? नवरा नाही मग आता कोणासाठी सुंदर दिसायचय? शोभा हसली. स्वतःसाठी सुंदर दिसायचय. आरशात बघताना, सेल्फी काढताना कसं कॉन्फिडन्ट वाटायला हवं. आता स्वतःच्या आनंदासाठी सगळं करायचं. आयुष्याच्या या वळणावर स्वतःसाठी जगायचं. आधुनिक वानप्रस्थाश्रमाची ही एक बाजू आहे. कळलं?

***

# 12 माझीया मना

अनाथ आश्रमात आज आनंदाचे वातावरण होते. सुमन ताईंचा सत्तरावा वाढदिवस होता.

आश्रमातली मुलं त्यांना स्वतः केलेल्या वस्तू भेट देत होती. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. सुमन ताई हसत होत्या पण मनातल्या कोरड्या हुंदक्यांचा आवाज त्याना ऐकु येत होता. आता कोरडे हुंदकेच उरले होते. अश्रुंचा कोसळ केव्हाच थांबला होता. कोरडे हुंदके ही काही दिवसात  थांबणार होते त्या जाणुन होत्या.

ज्या दिवशी त्यांचा एकुलता एक मुलगा श्रवण वडिलांशी भांडुन आईचा विचार ही न करता घर सोडून गेला तेव्हा त्या कोसळुन पडल्या. वडिलांच्या विचित्र, विक्षिप्त स्वभावाची झळ श्रवणला लागू नये म्हणून त्या कायम सावध असायच्या. श्रवणला ही आईच लागायची. श्रवण लहान असल्यापासून त्यांच आणि श्रवणचं एक वेगळं जग निर्माण झालं ते तो मोठा झाला तरी तसच राहिलं. ते जास्त समृद्ध झालं. सुमन ताई ना आपल्या ह्या नात्याचा अभिमान होता. माय लेकाचं एकमेकांवरचं प्रेम त्यांची जगण्याची ताकद होती. एक दिवस श्रवणचं वडिलांशी भांडण झालं. त्याचा

लहानपणापासून मनात कोंडुन ठेवलेला राग बाहेर पडला. आईचे अश्रु, शपथा त्याला थांबवु शकले नाहीत. तो तडकाफडकी घर सोडून गेला. सुमन ताई निश्चल झाल्या. आतल्या आत खुप उलथापालथ होत होती. उलट सुलट विचारांच वादळ थैमान घालत होतं. त्या थकुन गेल्या. एका क्षणी त्याना जाणवलं त्यांचा श्रवण बाळ पुरुष होता. आईचं दुःख, एकटेपणा ह्यापेक्षा त्याचा अहंकार मोठा होता.

सुमन ताईनी आश्रमात मन रमवलं. आपली माया त्या मुलांना दिली. पण मनाशी एक खुणगाठ बांधली. आता कोणतीही अपेक्षा न ठेवता रहायचं कोणात गुंतायचं नाही. प्रत्येक घटनेपासून लगेच अलिप्त व्हायचं. आज श्रवण त्याना भेटायला आला होता. तो एकटा पडला होता. त्याला आईचा आधार हवा होता. तो माफी मागत होता. सुमन ताई हसल्या अरे रागच नाही तर माफी कसली? तु माझ्या बरोबर माझ्या घरी रहा. आई आहे मी तुझी. श्रवणने त्याना मिठी मारली. त्यानी त्याच्या पाठीवरून हात फिरवला. पण अलिप्त होत्या त्या. वात्सल्याचा उमाळा उचंबळून आला नव्हता. त्याना बरं वाटलं. आता परत भावनांच्या गुंत्यात त्याना गुंतायचं नव्हतं. त्या शांत झाल्या. स्वतःशीच हसत गुणगुणायला लागल्या

गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा.

# 13 गिफ्ट

आज त्याच्या डोळयात तिच्या बद्दलचे कौतुक मावत नव्हते. लग्नाच्या दुसऱ्या वर्षाच्या दिवाळीला त्याच्या घरी त्याचे कोकणातले आई वडील, काका काकू, बहिण भाचरं सगळे रहायला आले होते. घराचं गोकुळ झालं होतं. त्याला माहित ही नव्हतं. तिने त्याला सरप्राईज गिफ्ट दिलं होतं. पाडव्याला तिने सगळयाना भेट वस्तू दिल्या. त्याला प्रश्न पडला ओवाळणीत काय घालावं? तेवढ्यात आईने त्याच्या हातात बॉक्स दिला. आत हीऱ्याचा नेकलेस होता. आई म्हणाली आमच्या हीऱ्यासारख्या सुनेला प्रेमाची भेट. सगळयानी टाळया वाजवल्या. तिने त्याच्याकडे पाहिले. त्याच्या डोळयात कौतुक. हिच्या डोळयात आनंदाश्रू.

***

# 14 आत्मविश्वास

त्या दोघांचा संसार प्रवास म्हणजे अडथळयांची शर्यत. तो मुका म्हणून ती बहिरी. लहानपणापासून त्याच्या आईबाबांनी त्याला अती धाकात ठेवलं होतं. त्यांच्यासमोर ब्र काढायची त्याची हिंमत होत नव्हती. मोठं झाल्यावर ही त्याचा भित्रा स्वभाव तसाच राहिला. त्याच्या अशा स्वभावामुळे तिला बहिरी होण्याशिवाय पर्याय नव्हता. असच वर्ष गेलं. तिच्याकडे आनंदाची बातमी आली. दोघांना ही आनंद झाला. पण आई बाबा त्यांच्या परिघातून बाहेर यायला तयार नव्हते. तिच्या लक्षात आलं आता जर तिने पाऊल उचललं नाही तर तिच्या बाळाची अवस्था पण तिच्या नवऱ्यासारखीच होणार. तिने एका निश्चयाने त्याचा हात धरला आणि सगळे अडथळे ओलांडून ती घराबाहेर पडली. आता ती बोलणार होती, ऐकणार होती. समाजातले कोणतेही अडथळे पार करण्याचा विश्वास तिच्या चेहऱ्यावर झळकत होता.

***

# 15 आनंद

कालच नाम्याने गणवेश स्वच्छ धुऊन ठेवला होता. चड्डी ला ठिगळं होती पण आज ती त्याला टोचत नव्हती. आज तो आणि त्याची आई आनंदात होते. त्याच्या चेहऱ्यावर बाबाविषयी अभिमान आणि माया ओसंडून वहात होती. आई सारखे डोळे पुसत होती. आज त्याला बाबा देशासाठी शहीद झाला म्हणजे किती मोठा आहे हे कळलं होतं. देशासाठी त्याने मोठं काम केलं होतं. आज शाळेत झेंडा वंदना ला कोणत्या नेत्याला बोलावलं नव्हतं तर त्याच्या आईला बोलावलं होतं. आई ठेवणीतली साडी नेसून डोक्यावर पदर घेऊन तयार झाली. नाम्याने बाबा चा फोटो छातीशी घट्ट पकडला. दोघं ही आनंदाने मान ताठ करून शाळेकडे निघाले.

***

# 16 ओटी

दुपारपासून पाऊस कोसळत होता. आज अष्टमी. महालक्ष्मीची ओटी भरायला जायचं म्हणून नेहा तयार झाली होती. गेल्या पंधरा वर्षांत एकदाही तिची ओटी चुकली नव्हती. तिचा नवरा अजय कसाबसा घरी पोहचला. पाऊस थांबायच चिन्ह नव्हतं.

सासूबाईना पण तिची ओटी चुकणार म्हणून वाईट वाटत होतं. कारण त्यांच लग्न झालं. अजय झाला आणि एका वर्षातच त्यांचे यजमान अपघातात गेले. त्या विधवा झाल्या आणि सवाष्ण, ओटी ह्या सगळ्या सोहळ्यांपासून त्या दूर गेल्या. इतर दुःखांबरोबर ते ही दुःख त्यानी मनात लपवलं.

रात्रीचे दहा वाजले पाऊस थांबला नव्हता. नेहा देवघरात गेली. देवाना नमस्कार केला. तिचं लक्ष देवीकडे गेलं आणि मनात लख्ख वीज चमकली. देवी तिला काही तरी सांगत होती. नेहा आनंदली. तिने देवघरात पाट मांडला. रांगोळी काढली. तिने अजयला सांगीतलं आईना घेऊन ये. अजय चमकला. तो आनंदित झाला. त्याने आईला हाक मारली. "काय रे काही सुचतय का?"

"हो. तुझ्या सुनेला सुचलय."

त्या दोघानी आईना धरुन पाटावर बसवलं. त्या ताडकन उठल्या. थरथर कापत होत्या. आई शांत व्हा. मला हे देवीनेच सुचवलं. आई अजय लहान असल्यापासून तुम्ही संसाराची धुरा एकटीने समर्थ पणे पेललीत. संसारातल्या अडचणींची, तुमच्या एकाकी पणाची झळ अजयला लागु दिली नाहीत. मला मुलीचं प्रेम दिलत. तुम्हाला कुठलं ही सुख मिळालं नाही तरीही दुसऱ्याचा हेवा केला नाहीत.कायम आनंदी हसतमुख असता.

आज मी तुम्हाला सवाष्णीचा मान देणार आहे. तुमची साग्रसंगीत ओटी भरणार आहे. नेहाने त्याना हळदी कुंकू लावलं. त्यांच्या केसांत गजरा माळला. साडी नारळाने ओटी भरली. दोघींचे ही डोळे भरून वहात होते. अजय ही हळवा झाला. दोघांनी त्याना नमस्कार केला. अजय म्हणाला

"आई आता रोज तु असच छान रहायचं."

नेहाला त्यानी मिठीत घेतलं. त्या निःशब्द होत्या पण त्यांचा स्पर्श खुप काही सांगत होता.

अगदी काळजाच्या आतलं. देव्हाऱ्यातल्या देवीच्या चेहऱ्यावर निराळच तेज होतं.

***

## 17 अबोल प्रित

ती स्वयंपाकघरात काम करता करता खुदकन हसली. तिचं आवडतं गाणं लागल्यावर तिला ऐकु यावं म्हणून त्याने आवाज मोठा केला होता. आज टेबलावर ताजे पेरु दिसत होते. थोडे कच्चे तिला आवडतात तसे. तो लहानपणापासून अबोल होता. तिला माहित होतं लहानपणी सोसलेल्या दुःखामुळे तो अबोल झाला होता.

मैत्रीणी तिची चेष्टा करत. तो तुझ्याशी तरी बोलतो का असं विचारुन हसत. सगळेच तिला हा प्रश्न विचारत. त्याची अबोल प्रित तिला उमजत होती. त्याच्या छोट्या छोट्या कृतीतून तो व्यक्त करत होता.

त्यांच प्रेम आणि संसार अधिकच बहरत होता. तिच्या समंजसपणामुळे आणि त्याच्या प्रामाणिक, सच्च्या प्रेमामुळे.

***

# 18 अगतिक मातृत्व

रेखा ताई देवघरात होत्या. पुजा संपलीच होती. प्रार्थना सुरू करणार इतक्यात त्याना अमेयचे चित्र विचित्र आवाज ऐकू येऊ लागले. तो त्याना बोलवत होता. त्यानी देवाला हात जोडले आणि उठल्या.

त्या अमेयच्या खोलीत आल्या. त्याना पाहिल्यावर अमेयचा चेहरा आनंदाने फुलला. त्यानी त्याच्या चेहऱ्यावरुन मायेने हात फिरवला. आता त्याच सगळच आवरायचं होतं. अमेय लहान नव्हता. पंचवीस वर्षांचा तरुण होता. तो फक्त आईचा मुलगा होता. त्याच्या बाबानी त्याच्याकडे केव्हाच पाठ फिरवली होती. त्यानी मान झटकली आणि त्याचं आवरायला सुरुवात केली.

अमेय जन्मल्यापासून अंथरुणाला खिळुन होता. तेव्हापासून रेखाताईंच्या पदराची गाठ त्याच्या सदऱ्याशी बांधलेली होती. उठल्यापासून झोपेपर्यंत त्यांचा सगळा वेळ अमेय आणि स्वयंपाक घरातल्या कामात जात होता. हे रहाटगाडगं गेली पंचवीस वर्ष अविरत चालू होतं .

अमेयपेक्षा दोन वर्षानी मोठी त्यांची मुलगी होती निशा. अमेय झाला आणि तिला आईची कुशी मिळालीच नाही. पण ती हुषार

होती. समजुतदार होती. आईच्या कष्टांची तिला जाण होती. तिने कधीच तक्रार केली नाही. आपोआपच ती स्वावलंबी होत गेली. कधी कधी रेखाताईना तिच्या अकाली मोठं होण्याबद्दल खुप वाईट वाटायचं. मग त्या तिला जवळ घेऊन कुरवाळत. त्यांचे डोळे घळाघळा वहात. निशा त्याना कुशीत घेऊन त्यांची समजूत काढत असे.

आता मात्र रेखा ताई शारीरिक, मानसिक थकत चालल्या होत्या. रात्री अपरात्री त्या दचकून जाग्या व्हायच्या. घामेघुम झालेल्या असायच्या. पाणी पिऊन देवघरात जायच्या आणि बाळकृष्णाला प्रार्थना करायच्या. प्रार्थना करताना हमसा हमशी रडायच्या.

एक दिवशी पुजा झाली. प्रार्थना झाली. तरी अमेयच्या खोलीत शांतता होती. त्याना आश्चर्य वाटलं. त्या खोलीत गेल्या. अमेय शांत झोपला होता. त्यानी त्याच्या बाबाना हाक मारली डॉक्टर आले. त्यानी अमेयला मृत घोषित केले. शेजारी, नातेवाईक आले सगळे शोकाकुल झाले. रेखा ताई त्याच्याकडे एकटक पहात होत्या.

त्या देवघरात गेल्या. त्यानी बाळकृष्णाला नमस्कार केला. "कसे आभार मानु तुझे? रोज तुला  प्रार्थना करत होते माझ्या आधी

माझ्या या गोळ्याला ने म्हणजे मी तुझ्याकडे येताना शांत मनाने येईन. रागावलास का रे आपल्याच मुलाचा मृत्यू मागणाऱ्या आईवर? काय करू रे? अगतिक मातृत्व हा फार मोठा शाप आहे. आजवर निशावर  अन्याय झाला. आई म्हणुन माझी इच्छा होती की माझ्या नंतर ती अमेयमध्ये अडकु नये. तु प्रार्थना ऐकलीस मी धन्य झाले." निशाने त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. त्या तिला बिलगून रडू लागल्या. दुःखाचे आणि सुटकेचे अश्रु.

***

## 19 सखा

पंचवीस वर्षे पलंगावर लोळागोळा होऊन पडलेल्या आणि नुकत्याच शांत झालेल्या मुलाच्या देहाकडे शीलाताई शांतपणे पहात होत्या. मनात भावनांचा कल्लोळ होता पण चेहरा निर्विकार होता. सगळे शोक व्यक्त करत होते. हळुच त्या देवघरात गेल्या. बाळकृष्णाला हात जोडले. तुझे आभार कसे मानू? अनंत उपकार केलेस. रोज तुला प्रार्थना करत होते माझ्या आधी माझ्या या गोळ्याला ने. लाज राखलीस. खरा सखा झालास. आता मागे काही चिंता नाही. मी सुखाने डोळे मिटीन.

***

## 20 अंतर

ती त्याच्या फोटो समोर उभी राहुन म्हणाली तुला माहितेय माझी मैत्रीण मला म्हणाली हल्ली तु शब्दातून छान व्यक्त होतेस. ती आता माझी गरज झाली का रे? तु असताना कुठल्याही परिस्थितीत असणारी तुझी भक्कम साथ. तुझ्यावरचा दृढ विश्वास हाच मोठा भावनिक आधार होता. आता तो मी शब्दातून शोधतेय का? सांग ना. तो फोटोतून हसत होता. तिचे डोळे भरून आले.

अल्याड पल्याड चं हे अंतर--------'.

***

# 21 विश्वास

रात्री उशिरा फोन वाजला. बस दरीत कोसळली होती. तो रेस्क्यु टीम मध्ये होता. ती म्हणाली सांभाळून हं. त्याने तिला जवळ घेतलं. तुझा हा च शब्द मला सुरक्षित ठेवतो. तो भराभर निघुन गेला. ती दारातून अभिमानाने बघत होती. ती देवघरात आली. समई लावली आणि हात जोडून उभी राहिली. काही सांगायचं नव्हतच. कारण सांभाळून ह्या तिच्या शब्दातलं सुरक्षा कवच देवाच्या आशीर्वादाचच तर होतं.

***

# 22 सहचारीणी

मुक बधीर मुलासाठी ऐकता, बोलता येणाऱ्या मुलीकडून होकार आल्यावर घरातील सगळयाना आनंद झाला. पण सुमन ताईनी ठाम नकार दिला. त्या म्हणाल्या त्याला फक्त बायको नको. सहचारीणी हवीय. ती त्याच्या सारखी असली तरच तिला त्याच्या अडचणी समजतील. दोघं एकमेकांच्या अडचणी सांभाळून घेऊन संसार करतील तेव्हाच नात्याचे बंध घट्ट होतील. नाहीतर संसार म्हणजे नुसती तडजोड असेल.

***

# 23 निरागस प्रश्न

शेजारच्या आजोबांनी आत्महत्या केली अस बाबा आईला सांगताना पिंकीने ऐकलं. आई म्हणजे आजोबा बाप्पा च्या घरी गेले ना? बाबा आजोबा माझ्याशी राक्षसासारखे घाण घाण वागले म्हणून बाप्पा त्याना आता शिक्षा करेल आणि चांगले आजोबा करुन परत आपल्या कडे पाठवेल. ते निरागस, निष्पाप बोल ऐकताना आई बाबा का रडतात हे पिंकीला कळलं नाही.

***

# 24 हळदी कुंकू

श्रावण शुक्रवारच रियाचं हळदी कुंकू आज छान पार पडलं. तिने शहीद जवानांच्या सौभाग्यवतीना आणि स्वतः च्या हिमतीवर संसार सांभाळणाऱ्या कामगार स्त्रीयांना बोलावलं होतं.

दुध फुटाण्यांबरोबर पावभाजी, ढोकळा, गाजर हलवा अशी डीश ठेवली. सगळ्यांच्या ओट्या भरल्या. एक एक पर्स दिली. सुरवातीला सासूबाई नाराज होत्या. पण त्यांच्याशी गप्पा मारताना रियाने योग्य केलं हे पटलं. शहीद जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करायचा छोटासा प्रयत्न.

***

## 25 भातुकलीच्या खेळामधली

आजीने प्राण सोडताना नातीला हात जोडून धन्यवाद दिले. आई बाबा आश्चर्याने बघत होते. नात अश्रू पुसत म्हणाली मी आजीला महिनाभर माझ्याकडे रहायला आणले. तिच्या हातात माझं पूर्ण घर मुख्य स्वयंपाकघर सोपवले. ती खुष झाली. मी तिची डायरी वाचली होती. आजोबा लवकर गेले. सासरच्या मोठ्या घरात फक्त काबाडकष्ट नशीबी आले. सत्ता लहान जावांची होती. बाबा डॉक्टर झाल्यावर आजीला मुंबईला घेऊन आले. आई तुला सांगितलं तिने खुप कष्ट केलेत. तिला विश्रांती दे. तु सगळ्या कामाला माणसं ठेवलीस. घराचं स्वामित्व तुझ्याकडे होतं .

आजी आतल्या आत मिटुन गेली. तिला तिच्या मनासारखं काही मिळालच नाही. मी तिला माझ्या घरी आणून घर तिच्या ताब्यात दिलं. खुप खुश होती. त्या खुशीतच शेवटचा श्वास घेतला.

****

## 26 पांडुरंग हरी

तिला सून येऊन वर्ष झालं होतं. सगळ्यातून ती हळूहळू बाजूला होत होती. घरचं वातावरण आनंदी होतं. ती समाधानी होती. तिने देवाला प्रार्थना केली. 'देवा मला आता पूर्ण मोकळं होऊ दे ह्या संसारातन. मन अलिप्त होऊ दे. कुठे ही अडकायला नको. मला लवकर तुझ्या चरणाशी ने.

त्या दिवशी रविवार होता. ती दोघं सुट्टीच्या दिवशी उशिरा उठतात. ती सगळं आवरून टी.व्ही. बघत होती. तेवढ्यात मुलगा आला आणि तिच्या मांडीवर डोकं ठेवून झोपला. आई आज तू भरल्या वांग्याची भाजी कर ना. खुप दिवसात तुझ्या हातची खाल्ली नाही. तिने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. तेवढ्यात सून दुसऱ्या बाजूने तिच्या मांडीवर डोकं ठेवून म्हणाली आई मला गोळ्याची आमटी. तिने सुनेच्या डोक्यावरुन हात फिरवला. मनात म्हणाली पांडुरंगा छान चाललय तुझं. 'अरे तुम्ही मांडीवरुन उठलात तर मी दोन्ही करीन ना?' दोघांनी तिला मिठी मारली. ती शांतपणे किचनकडे निघाली.

****

## 27 मनाची ताकद

तो कोवीड पॉझिटीव म्हणून हॉस्पिटलला ॲडमिट होता. एकटच हॉस्पिटलमध्ये रहायचं. बायको, मुलं, आई बाबा सगळे घरात पण लक्ष सगळं ह्याच्याकडे. जो तो आतमध्ये एकटाच नकारात्मक विचाराना मनातून दूर ढकलायच्या प्रयत्नात. आयुष्यभर माणसांमध्ये राहीलेला तो. त्याला एकटेपणा सहन होत नव्हता. त्यापेक्षा मरण बरं. नकारात्मक विचार त्याला घेरु लागले. अचानक त्याला स्वातंत्र्यवीर सावरकर आठवले. काळ्या पाण्याची शिक्षा त्यानी देशासाठी सहन केली. आपण तर आपल्या नशिबाने इथे आलोत. आपल्या कुटुंबासाठी आपल्याला सकारात्मक विचार करून ह्या आजारातून उठलच पाहिजे. त्याने मनोमन सावरकरांच्या मनाच्या अफाट ताकदीला मानलं आणि त्यांना नमस्कार केला.

***

## 28 कान्हा

तिची मुलगी आणि जावई कोरोनाने गेले. त्यांच्या आठ महिन्याच्या मुलाला सांभाळणं हिला एकटीला शक्य नव्हतं. तिने दत्तक देण्यासाठी जाहिरात दिली. एक तरुण जोडपं आई वडिलांना घेऊन भेटायला आलं. सगळी माहिती काढल्यावर बाळ त्याना दत्तक द्यायचं निश्चित झालं. रात्री नातवाकडे बघताना हीचे अश्रू थांबत नव्हते. भावनांचा कल्लोळ मनात थैमान घालत होता. तिने बाळाला जवळ घेतलं. त्याची पापी घेतली आणि म्हणाली मी पण विवश आहे रे. कॅन्सरमुळे मी पण फार जगणार नाही. तिने मुलीच्या फोटोकडे पाहिले. देवकीचा कान्हा यशोदेकडे चाललाय. मग मी कोण कृष्णा? माझा जीव अडकलाय रे. माझ्या माथी आश्वत्थामाची जखम दिलीस अविरत भळभळणारी.

***

# 29 आत्मानंद

त्यांच्या गुरुना हॉस्पिटलला ॲडमिट केलं होतं. हिचा नवरा आणि ही भेटायला गेले. हिच्या डोळ्यात अश्रू. गुरु आश्वासक हसले. त्यानी सांगीतलं सकाळचा चहा आणि रात्रीचा जेवणाचा डबा तू दे. हिच्या आनंदाला पारावार राहिला नाही. पालेभाजी, चटणी, कोशिंबीर, ताक, फुलके सगळं करताना हिच्या हृदयात प्रेमाचे, वात्सल्याचे उमाळे. डोळे सारखे भरून येत. असं का होतय कळत नव्हतं पण एक अनामिक आनंद मनात ओसंडून वाहत होता. हिच्या नवऱ्याने डबा नेला. गुरु आनंदाने जेवले. नवऱ्याजवळ निरोप दिला. जेवण आवडले आणि स्वयंपाक करतानाच्या भावना पण पोहचल्या. नवऱ्याने विचारलं म्हणजे काय? हिचे डोळे वहात होते. हिने देवासमोर डोकं टेकवलं. नि:शब्द होऊन आतला आनंद अनुभवत होती.

****

# 30 गुरु दक्षिणा

तिची पाच वर्षांची मुलगी झोपडी समोर खेळत होती. ती धुण्याभांड्याच्या कामावरून येताना दोघींना वडापाव घेऊन आली. मुलीला वडापाव दिला मात्र ती पळत समोर बसलेल्या लंगड्या आजीकडे गेली आणि अर्धा वडापाव आजीला दिला.दोघी आनंदाने वडापाव खात होत्या. ही अभिमानाने आपल्या मुलीकडे बघत होती. समोरच गाडीत बसलेली आधुनिक मॅडम हे सगळं बघत होती. तिने पर्स मधुन पैसे काढले आणि ड्रायव्हरला दिले. काल ड्रायव्हर ने आईच्या औषधासाठी पैसे मागितले होते पण ही नाही म्हणाली होती. आज निरागस दातृत्व बघुन हिच्या मनात काही तरी लकलकलं. आजपासून हिची वाट बदलणार होती. हिने पिशवीतली फळं त्या मुलीला दिली. मुलगी गोंधळून गेली. हे कशाला?

ही म्हणाली गुरुदक्षिणा.


****

## 31 मदर्स डे

मदर्स डे ला सुनेचं तिच्या आईशी चाललेलं बोलणं ऐकून मंगलचे डोळे पाणावले. तिचं मन तिच्या बडबडीसाठी आक्रंदत होतं. एका क्षुल्लक कारणावरुन सासरे आणि जावई ह्यांचा वाद झाला आणि दोन्ही घरांचे संबंध तुटले. मायलेकी एकमेकींपासून दुरावल्या. त्यांच्या भावनांपेक्षा पुरुषांचा अहंकार वरचढ ठरला. आता येते म्हणून सून घराबाहेर पडली ती थेट नणदेकडे जाऊन धडकली. तिने नणदेची कानउघडणी केली. कुठल्या काळात वावरतेस? तुझं माहेर तुझं हक्काचं विसाव्याचं स्थान आहे. आईच्या मायेची सर दुसऱ्या कशाला नाही. आई तुला कुशीत घ्यायला तळमळतायत. लेकीला हुंदका फुटला. नणदा भावजया हात धरुन ताठ मानेने बाहेर पडल्या. लेकीला आईच्या कुशीची ओढ लागली होती.

****

पुस्तकावर फक्त क्लिक किंवा टॅप करा. एक मिनिटात उघडेल.



साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे टप्पे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com